महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३८२९
Email- rajesh.wadnekar@nic.in

क्रमांक: अनौसं २०२५/उवतंशि/प्र.क्र.०१/का.४ दि:-०५ डिसेंबर,२०२५

प्रति,

महाप्रबंधक,
मा.उच्च न्यायालय,
मुबई.

**विषय:-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणावर पीठासीन अधिकारी नियुक्तीच्या अनुषंगाने मा.मुख्य न्यायमुर्ती,मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शिफारस केलेल्या व्यक्तींची नावे पाठविण्याबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र.ए.१२१६/८७/१२५५/२०२५,दि.१०.७.२०२५.

महोदय,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणावर पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्तीच्या अनुषंगाने इच्छुक असलेल्या मा.उच्च न्यायालयाचे कार्यरत/ सेवानिवृत्त न्यायाधिश किंवा उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्हता प्राप्त असणा-या व मा.मुख्य न्यायमुर्ती,मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी शिफारस केलेल्या व्यक्तींची नावे उपलब्ध करुन देण्याबाबत आपणास यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

२. त्याअनुषंगाने आपण संदर्भाधीन दि.१०.७.२०२५ च्या पत्रान्वये दोन व्यक्तींची नावे कळविली आहेत. सदर नावे उच्च व तंत्रशिक्षण विभागास पाठविण्यात आली आहे. तथापि उपरोक्त नमूद पदावर नियुक्तीकरीता तीन व्यक्तींच्या नामिकेतून एका व्यक्तीची निवड करण्यात येत असल्याने सदर कार्यवाही अदयाप पूर्ण झालेली नाही. तसेच या संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये काही न्यायालयीन प्रकरणेही दाखल झालेली आहेत. सदर बाबी विचारात घेता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणावर पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्तीच्या अनुषंगाने मा.मुख्य न्यायमुर्ती,मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी शिफारस केलेल्या अजून एका अर्हता प्राप्त व्यक्तीच्या नावाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी,ही विनंती.

आपला,

(रा. सु. वडनेरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

Scanned with OKEN Scanner